# मराठी साहित्यात स्त्री लेखिकांच्या बदलत्या भूमिका

**शैला आनंदराव क्षीरसागर** संशोधक विद्यार्थी Email-shalakarauts4@gmail.com

---

**प्रास्ताविक**

मराठी साहित्यप्रवाहाचा विचार करताना असे लक्षात येते की, स्त्री-लेखिकांनी मराठी साहित्यामध्ये फार मोठे योगदान देऊन काळानुरूप बदलत जाणाऱ्या त्यांच्या भूमिका अधिक सक्षमपणे मांडलेल्या पाहावयास मिळतात. समाजामध्ये बदल करण्याची ताकद त्यांच्या लेखणीमध्ये आहे. हे अनेक लेखिकांनी सिध्द करून दाखविले आहे. कथा, कादंबरी, नाटक, काव्य, चरित्र, आत्मचरित्र, निबंध, नियतकालिके या सर्वच साहित्यप्रकारामध्ये लेखन केले असून 'स्व' ला जपण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. एकोणिसाव्या शतकामध्ये ताराबाई शिंदेसारख्या पुरोगामी विचारांच्या एका स्त्रीने 'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंधवजा ग्रंथ लिहून स्त्री-पुरुष या दोघानांही समान हक्क असायला हवेत याची जाणीव करून दिली आहे .

बहिणाबाई चौधरीसारखी स्त्री जेव्हा आपल्या कवितेतून स्त्रियांचे दुःख, व्यथा, वेदना मांडून जाते तेव्हा तिच्यातील असणारा खंबीरपणा आणि बदलल्या काळाला सामोरी जाण्याची तिची क्षमता लक्षात येते. वैधव्य प्राप्त होऊनही संसाराचा गाडा एकटीने पुढे नेला आहे. कोणालाही दोष न देता मन खंबीर केले आणि मनगटात नवे बळ आणून आपल्या काव्यातून जीवनाला हसत सामोरे जाण्याचा उपदेश समग्र स्त्रियांना केलेला दिसून येतो.

ताराबाई शिंदे यांनी आपल्या बंडखोर स्वतंत्र विचाराने स्त्रीशक्तीची जाणीव करून दिली तर बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या ओवीतून स्त्री अस्तित्वाची जाणीव अंतर्मनातून करून दिली आहे असे वाटते . त्याची भूमिका स्त्री म्हणून तर महत्त्वाची होतीच पण ती एक माणूस आहे याची जाणीवही करून दिलेली आहे.

विसाव्या शतकाच्या प्रारंभी अनेक स्थित्यंतरे होत गेली नव्या दिशा, नव्या जाणिवा, नवे प्रश्न यामुळे संपूर्ण समाज घुसळून निघाला आहे, याला स्त्रीयाही अपवाद नाहीत. या बदलांचा प्रभाव साहित्यावरही पडलेला दिसून येतो. विशेष करून चाकोरीबद्ध जीवनाला आपल्या आधुनिक विचाराने सुरुंग लावून अनेक स्त्रियांनी नवी दिशा दिली आहे. 'कांदबरी' या साहित्यप्रवाहामध्ये अनेक स्त्रीलेखिकांनी योगदान देऊन स्त्रियांच्या बदलत्या भूमिकांचा वेध घेतला आहे. याशिवाय त्यांच्या हक्काची जाणीव, त्यांच्यातील बंडखोरवृत्ती, स्वतंत्र विचारसरणी याचे दर्शन कादंबऱ्यातून घडले आहे. या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधात मराठी कादंबरी क्षेत्रातील स्त्री लेखिकांच्या भूमिका कशा काळानुरूप बदलताना दिसतात याचा वेध घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

**उद्दिष्ट्ये -**

१) मराठी साहित्यातील स्त्री लेखिकांच्या बदलत्या भूमिका काय आहेत हे कादंबऱ्याच्या अनुषंगाने समजून घेणे.

२) आधुनिक स्त्रियांच्या अस्मितेचा शोध घेणे.

3) जुनाट रुढी-परंपरा यांना छेद देऊन स्वतःला सिद्ध करणाऱ्या स्त्री लेखिकांच्या कांदबऱ्याचा वेध घेणे.

**आधुनिक विचारांच्या स्त्री लेखिका-**

एकोणिसाव्या शतकात स्त्रीशिक्षणाची बीजे ज्या महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी रोवली त्या शिक्षणाचे वटवृक्षात रुपांतर होऊन 'स्त्रीवाद' रूपी फळे समाजाला मिळालेली आहेत. स्त्री शिक्षणामुळे अनेक स्त्रिया शिकू लागल्या. आपले विचार सक्षमपणे मांडू लागल्या. साळूबाई तांबवेकर गोदावरीबाई पंडित, काशीबाई कानिटकर यांनी आपल्या कादंब-यातून स्त्री शिक्षणाला महत्त्व दिले आहे, परंतु त्याचबरोबर काही स्त्री लेखिकानी आपली भूमिका मात्र फारशी बदलेली दिसत नाही. जुन्या रुढी परंपरेला महत्त्व देताना दिसतात. यशोदाबाई भट , कमलाबाई सोहोनी, शांताबाई नाशिककर, इंदिराबाई सहस्त्रबुद्धे यासारख्या लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यातून वैचारिक बंडखोरी, स्त्रीची अस्वस्थता, हतबलता, कौटुंबिक जीवनात होणारी घुसमट रेखाटून समाजातील वास्तव समोर आणले आहे .

रुढी-परंपरा बुरसट विचार यामध्ये बदल करण्याची एक मानसिक शक्ती स्त्रियांमध्ये असते. त्या शक्तीला 'स्त्रीवाद' म्हटले तरी योग्य ठरेल. ही केवळ चर्चा नसून समाजाच्या मानसिकतेत परिवर्तन करण्याची एक शक्ती आहे. जोपर्यंत समाजाची मानसिकता बदलत नाही तोपर्यंत स्त्रियांचे प्रश्न सुटणार नाहीत. स्त्रियांनी एका विशिष्ट चौकटीत राहून जीवनजगण्यासाठी प्रवृत्त केले होते. एवढेच नव्हे तर तिची मानसिकताही तशीच केली होती . केली होती. आपलं कुटुब हेच खरे विश्व आहे यापलीकडे तिला कशाचीही जाणीव करू दिली नाही. त्यांना दडपशाही वृत्तीने जगण्याची सवय करुन दिलेली असल्याने तिने स्वतःलाही कमजोर मानले होते. मुलगी, पत्नी, सून, माता, सासू या भूमिका निभावताना तिचे होणारे शोषण, तिला घरात असलेले दुय्यम स्थान याचा विचार एकोणिसाव्या शतकात होताना दिसतो.

विसाव्या शतकात अनेक स्त्रीलेखिकानी कुटुंब आणि समाजामध्ये येणाऱ्या विविध अनुभवांना शब्दबद्ध करून स्वत: चा माणूस म्हणून घेतलेला शोध दिसून येतो. यामध्ये विभावरी शिरूरकर यांची भूमिका महत्त्वाची वाटते. विभावरी यांनी कौटुंबिक

नातेसंबंध, कुटुंब आणि स्त्री यांच्यात असणारे सूक्ष्म पण भेदक असे ताणतणाव मांडून समाजातील न पटलेल्या रुढी-परंपरांना छेद दिला आहे.

गेली हजारो वर्षे स्त्री ही पुरुषांच्या शोषणाला बळी पडताना दिसून येते. पुरुषांप्रमाणे स्त्रीलाही जगण्याचा हक्क असून तिला पुरुषांच्या गुलामगिरीतून स्वतंत्र करण्याचा ध्यास त्यांच्या वैचारिकतेमध्ये दिसून येतो. त्याची चिंतनशील आणि वैचारिक वृत्ती स्त्रियांच्या आत्मसन्मानासाठी जागृत होताना दिसते.

समाज स्त्रीकडे केवळ तिच्या शरीर सौंदर्याला अधिक महत्त्व देतो, तिच्या सौंदर्यात कमतरता असेल तर भरमसाठ हुडा घेण्याची पद्धत होती म्हणजेच तिच्या मनाच्या सौदर्यापेक्षा शरीर सौंदर्याला अधिक महत्व दिले जाते. हा दृष्टीकोन बदलवून स्त्रीमधील अस्मिता जागृत करण्याचा प्रयत्न विभावरी शिरूरकरांनी केला आहे. त्यांनी समाजातील स्त्रीयांचे अनेक प्रश्न हाताळून स्त्रीवादी भूमिका आपल्या कादंब-यातून स्पष्ट केलेली दिसून येते .

'हिंदोळ्यावर' या कादंबरीने संपूर्ण समाजाला एक हादरा दिलेला आहे. या कादंबरीतून परित्यक्ता स्त्रियांच्या दयनीय जीवनाचा आलेख मांडण्याचा प्रयत्न केला आहे. एकीकडे व्यसनी, गुन्हेगार, नवरा फक्त नावालाच, त्याच्याच नावाने कुंकू लावणारी अचला मनाला अस्वस्थ करून जाते. दुसरीकडे राजाई मात्र आपल्या अपात्र नवऱ्याला सोडून दुसऱ्या पुरुषाला स्वीकारते. तिची ही बंडखोरी विचार करायला प्रवृत्त करते . 'विरलेले स्वप्न' या कांदबरीतून विवाह हा एक स्त्री- पुरुषामधील करार असून स्नेह, प्रेम याला महत्त्व दिले आहे. 'शबरी' या कादंबरीतून स्त्रियांचा आत्मसन्मान हा केवळ पैशाने वाढत नाही याची जाणीव करून दिली आहे .विभावरी शिरूरकरांनी स्त्रियांच्या आत्मसन्मानासाठी लढाई करून आपली स्त्रीवादी भूमिका सक्षमपणे मांडलेली दिसून येते. सामाजिक रूढी परंपराविरुद्ध प्रतिक्रियात्मक लेखन करून त्यांचा दृष्टिकोन स्त्रीलक्ष्यी न राहता स्त्रीवादी झाला असे म्हटले तरी उचित ठरेल. त्यांच्या लिखाणात स्त्रीवाद म्हणजे| घरसंसार मोडून न टाकता आपले त्या घरात काय स्थान आहे याचा ख-या अर्थाने आत्मशोध घेणे हा आहे .याशिवाय बळी, उमा यासारख्या कांदबरीतून स्त्रीत्वाचे होणारे शोषण याला आपला समाजच कसा जबाबदार आहे किवा पुरुषी मानसिकता कशी कारणीभूत आहे .हे पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे . समाजाची मानसिकता बदलल्याशिवाय स्त्रीचे शोषण थांबणार नाही तिचा सन्मान होणार नाही, सामाजिक रुढी-परंपरा, स्त्रीदास्यत्व या सर्वावर मात करण्यासाठी या बदलांची आवश्यकता आहे, ही भूमिका येथे महत्त्वाची वाटते.

१९६० नंतर स्त्रीवादी साहित्य प्रवाहामध्ये अनेक लेखिकांनी कादंबरी लेखन करून मोलाची भर घातलेली दिसून येते. स्त्रीवादी दृष्टिकोन ठेवून स्त्रियांचे अनेक प्रश्न, त्यांच्या व्यथा, पुरुषी मानसिकता, कुटुंब आणि करिअर या दोन्ही सांभाळताना तिची तारेवरची कसरत या साऱ्यांचे चित्रण केले आहे. शिक्षणामुळे आणि राजकीय हक्क प्राप्त झाल्याने तिची पारंपरिक प्रतिमा सर्वांगाने बदललेली दिसते. सुशिक्षित झालेली स्त्री नोकरी करून पैसा कमवू लागली त्यामुळे तिचे स्थानही बदलत गेले, निर्णय घेण्याची क्षमता तिच्यामध्ये निर्माण झाली. या साऱ्याचे चित्रण कादंबऱ्यातून येऊ लागले

कमल देसाई यांनी 'काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई' या कादंबरीत स्त्रीवादी जाणिवेतून अस्मितेचा स्वतंत्रपणे शोध घेतला आहे . तिचा बाई म्हणून विचार करण्यापेक्षा तिचा माणूस म्हणून विचार व्हावा हा लेखिकेचा दृष्टिकोन महत्त्वाचा वाटतो. त्यांनी स्त्रियांचे प्रश्न मानसशास्त्रीय दृष्टीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे . स्त्री ही उपभोगाची वस्तू नसून ती एक माणूस आहे, तिला एक मन आहे. या मताचा पुरस्कार करून स्त्री-पुरुषांच्या संबंधावरही आपले विचार उघडपणे मांडले आहेत. एकूणच त्यांनी स्त्रीमनाचा पुरस्कार करून रुढी परंपरेच्या नावाखाली स्त्रियांच्या होणाऱ्या शोषणावर प्रकाश टाकला आहे . 'रात्रदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या लघुकादंबरीतून मानवी जीवनातील विसंगती , नियतीचे चक्र, अपेक्षाभंग उद्ध्वस्तता याचे दर्शन घडविले आहे. सामाजिक राजकीय जीवनासोबत उजाड, एकाकी असे व्यक्तिगत भावजीवनही चित्रित केले आहे .

ज्योत्सना देवधरांनी कादंबरी विश्वात आपला स्वतंत्र असा ठसा उमटविला आहे. घरगंगेच्या काठी, कल्याणी, पडझड या कादंबऱ्यातून एकत्र कुटुंब पध्दतीत स्त्रिच्या मनाची होणारी घुसमट पहायला मिळते पण त्याचबरोबर 'कल्याणी' सारख्या कादंब-यातून स्त्रियांना घातक असणा-या रूढी परंपरा काळानुसार बदलायला हव्यात असा आग्रह धरला आहे. विशेष करून एकत्र कुटुंबपद्धतीतील गुण-दोष आणि मर्यादा याचे अवलोकन केलेले दिसून येते

आशा बगे यांनी मनस्विनी, झुंबर, त्रिदल, सेतू, भूमी अशा अनेक कादंबऱ्यातून स्त्रीत्वाचा शोध घेतला आहे. मैत्रिणी, स्त्री-पुरुष नातेसंबंध, ताणतणाव, गुंतागुंत यातून एका नव्या अस्तित्वाचा शोध घेणाऱ्या स्त्रिया आधुनिक बदलाना सामोरे जाताना दिसतात. त्यांच्या कांदबऱ्यातील स्त्रिया बंडखोरी करतात पण संस्कृतीशी असणारी नाळ मात्र तोडत नाहीत. आधुनिक विचारांच्या या स्त्रिया मानवी मूल्यांना महत्त्व देताना दिसतात. या स्त्रिया दुबळ्या नसून आत्मभानाने जागृत झालेल्या, स्त्रीत्वाच्या मर्यादा न ओलांडता, आपली कर्तव्ये न विसरता, आपल्या कर्तृत्वाने सक्षमपणे उभ्या राहणाऱ्या या स्त्रिया अंतर्मुख करुन जातात.

गौरी देशपांडे यांनी एकेक पान गळावया, गोफ , मुक्काम, उत्खनन, निरगाठी अशा अनेक कादबऱ्या लिहून एक नवा आयाम प्राप्त करून दिला आहे. स्त्रियांच्या लैंगिक स्वातंत्र्याला महत्त्व दिले आहे. गेली हजारो वर्षे स्त्रियांच्या देहाबाबत समाजाची

जी मानसिकता आहे किंवा तिच्या देहाला नैतिकतेचे जे निकष आहेत ते निकष मोडून त्यांची कादंबरी देहाच्या पलीकडे गेलेली दिसून येते. जुनाट रुढी-परंपरा मोडीत काढून नव्या जाणिवांना सामोरे जाणारी स्त्री अधिक प्रगल्भ वाटते.

मेघना पेठे हे आणखी एक कादंबरी क्षेत्रातील महत्वाचे नाव. " या कादंबरीने साहित्य विश्वाला हादरा दिलेला आहे. स्त्रीला बाई म्हणून भोगावे लागणारे दुःख आणि पुरुषांच्या पुरुषी प्रवृत्ती पलीकडे स्त्रीचे जगणे आहे याची जाणीव करून दिली आहे. स्त्री-पुरुष लैंगिक संबंधाबाबत अनेक प्रश्न उपस्थित करून नैतिकता लैंगिकता यावर अभिव्यक्त होताना दिसतात. आक्रमकपणा, बंडखोरवृत्ती विचार करायला प्रवृत्त करते.

सानिया यांच्या कादंबऱ्या नव्या जाणिवा घेऊन जन्माला आल्या आहेत असे वाटते. शिक्षणामुळे स्त्री नवचेतना-नवजाणिवा घेऊन समाजात वावरताना दिसतात. त्याच्या कादंबऱ्यातील स्त्रिया स्वतःचा विकास करण्यासाठी काळानुरूप होणारे बदल स्वीकारणाऱ्या दिसतात. स्थलांतर, अवकाश आवर्तन या कादंब-यातून साकारलेल्या नायिका स्वतः मध्ये बदल घडवून समाजामध्ये स्वतःला सिद्ध करताना दिसतात.

प्रतिमा इंगोले बुढाई, पार्टटाईम, मोहरा अशा कादंब-यातून स्त्रियांचे केवळ प्रश्न वा समस्या मांडल्या नाहीत तर त्या संकटांना सक्षमपणे कशा सामोरी जातात याचे चित्रण केले आहे.

या लेखिकाशिवाय शांता गोखले, शैलजा राजे, प्रिया तेंडुलकर, शुभदा गोगटे, चंद्रप्रभा जोगळेकर, माधवी देसाई, शांता शेळके, रेखा बैजल, मृणालिनी देसाई, कविता महाजन, नलिनी मुळगावकर, सरोजिनी बाबर, गीता साने अशा अनेक स्त्रीलेखिकांनी काळानुरूप स्वतःच्या भूमिका बदलवून स्वतः ला सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष** -

१) परंपरेचा विळखा, स्वातंत्र्याची आस आणि जाचक परंपरा यामध्ये स्त्रियांची घुसमट होताना दिसते.

२) शिक्षणामुळे स्वतःमधील सामर्थ्य, स्त्रीत्व, याची जाणीव आविष्कृत होताना पहावयास मिळते.

३) सुधारणावादाकडून स्त्रीस्वातंत्र्याकडे झुकलेल्या स्त्रीया वैचारिकतेने प्रगल्भ होताना दिसतात.

४) विभावरी शिरूरकरांनी नवा पायंडा घालून दिल्याने स्त्रीविषयीची कल्पना बदलते, तिची असणारी पारंपरिक प्रतिमा बदललेली दिसते.

५) स्त्रियांमधील संयमितपणा, सहनशीलता, खंबीरता, निभर्यता, बंडखोरी अशा अनेक कंगो-याचे दर्शन घडते. विभावरी शिरुरकरांपासून मेघना पेठेपर्यंत अनेक स्त्री लेखिकांनी मराठी कांदबरीविश्वात मोलाची भर घालून स्त्रियांची बदलत्या काळानुरुप बदलत गेलेली विविध रूपे साकार होताना दिसतात.

**समारोप-**

एकूणच मराठी साहित्यविश्वात कादंबरी या साहित्यप्रकारात लेखन करणाऱ्या स्त्री लेखिकांच्या बदलत्या भूमिका या काळानुसार बदलत गेल्या आहेत. जुन्या रुढी-परंपरांना नाकारून एक माणूस म्हणून जगणं हा त्यांचा हकक असूनही समग्र पुरुषजातीने नाकारला होता अशावेळी या स्त्रियांच्या भूमिका कधी संयमितपणे, तर कधी सौम्य बंडखोर वृत्तीने, तर कधी आक्रमकपणे बदलल्या आहेत. या स्त्रियानी परंपरा व आधुनिकता यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्री म्हणून जगताना अनेक समस्याना सामोरे जावे लागत असूनही तिने आपली भूमिका न बदलता अधिक खंबीरपणे मांडली आहे हेच यश या स्त्री लेखिकाचे आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

**संदर्भ-**

१) मराठी कादंबरीचा इतिहास - चंद्रकांत बांदिवडेकर, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, द्वि.आ.१९८६

२) प्रदक्षिणा, खंड दुसरा – कॉन्टिनेन्टनल प्रका. पुणे द्वितीयावृत्ती -१९९८

३) स्त्री साहित्याचा मागोवा-खंड १,२,३ - डॉ. मंदा खांडगे,डॉ. लीला दीक्षित, डॉ. अरुणा ढेरे, विनया खडपेकर, प्रकाशक-साहित्यप्रेमी भगिनी मंडळ पुणे, ५८०, शनिवार पेठ, श्री समर्थ अपार्टमेंटस, कार्यालय केसरी कार्यालयासमोर, पुणे -४११०३०

४) आंतरजाल (विकिपिडीया)